## सत्र खटला क्रमांक ९०/२०२१

महाराष्ट्र सरकार

विरुध्द

श्रीमंत आण्णा नागरगोजे

**<u>निशाणी क्र. ११० खालील आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज हा आरोपी यांनी सा.क्र.१६, १७, १९ व २० यांचा 'उलट तपास नाही असा आदेश रद्द करणेसाठी व सदर साक्षीदारांना उलट तपासासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३११ अन्वये परत बोलाविण्यासाठी दिला आहे. सदर अर्जास अभियोग पक्षाने सदर अर्जावर लेखी म्हणणे देवून आक्षेप घेतलेला आहे.

२. अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. अभियोग पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता श्री. कदम व आरोपीतर्फे वकिल श्रीमती प्रियल मोरे यांचा युक्तिवाद ऐकला.

३. सा.क्र.१६, १७, १९ व २० यांना अनुक्रमे दिनांक १७/११/२०२५, १७/११/२०२५, २५/११/२०२५ व २७/११/२०२५ रोजी तपासण्यात आले आहे. परंतु, सदर दिवशी आरोपी यांचे वकिल श्री. अंकित बंगेरा साक्ष नोंदविताना गैरहजर होते. म्हणून सदर साक्षीदारांचा 'उलट तपास नाही' असा आदेश पारित करण्यात आला होता. आरोपी यांच्या प्रस्तूत अर्जामध्ये नमूद केलेली कारणे संयुक्तिक वाटत आहे. सदर खटल्यातील गुन्हयाचे स्वरुप पहाता आरोपी यांना बचावाची पूर्णपणे संधी देणे न्यायतत्वानुसार आवश्यक आहे. सदर आरोपीस साक्षीदारांचा उलट तपास घेण्याची संधी न दिल्यास त्यांचे न्याय हक्कावर गदा येउ शकते. त्यामुळे सा.क्र. १६, १७, १९ व २० यांचा 'उलट तपास नाही' हा आदेश रद्द होउन सा.क्र. १६, १७, १९ व २० यांचा उलटतपास घेणेस आरोपीवर

खर्च आकारुन संधी देणे न्यायोचित वाटते. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. सा.क्र. १६, १७, १९ व २० यांना प्रत्येकी खर्च रक्कम रुपये १५००/– (रुपये पंधराशे मात्र) देणेचे अटीवर सदर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सा.क्र. १६, १७, १९ व २० यांचा 'उलट तपास नाही' असा आदेश रद्द करण्यात येत आहे.

३. सा.क्र. १६, १७, १९ व २० यांना त्यांचा उलट तपास घेण्यासाठी पुन्हा बोलावण्यात यावे.

SANTOSH RAMU CHAVAN

Digitally signed by SANTOSH RAMU CHAVAN
Date: 2025.12.15 17:52:06 +0530

पनवेल. (संतोष रा. चव्हाण)

दिनांक १५/१२/२०२५ अति. सत्र न्यायाधीश,

पनवेल रायगड.